

# बामसेफ (सामाजिक संघटन)

मा. कांशीरामजी साहेब
संस्थापक अध्यक्ष, बामसेफ

मा. ॲड. डॉ. सुरेश माने सर
प्रमुख मार्गदर्शक, बामसेफ
(माजी विधी विभागप्रमुख मुंबई विद्यापीठ)


अरुण सुर्वे
(B.A.,MSW,NET)
जिल्हा संयोजक, जालना

कार्यालय पत्ता : अनिकेत रेसिडेन्सी, आंनद नगर, जालना — मोबाईल - 9763683682


जा.क्र. 01 — दिनांक : 26/12/2017

प्रति,

प्राचार्या मॅडम,

राष्ट्रमाता इंदिरा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान

महाविदयालय शिवनगर, जालना

विषय : ३१ डिसेंबर २०१७ रोजी एक दिवसासाठी हॉल मिळणेबाबत

महोदया,

वरील विषयास अनुसरून सविनय सादर करण्यात येते कि, बामसेफ युनिट जालनाच्या वतीने संत गाडगे महाराज स्मृर्तीदिन व भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त बहुजन महापुरुषाची विचारधारा या विषयावरती एक दिवसीय प्रशिक्षण शिबीर आयोजित केले असून ३१ डिसेंबर २०१७ रविवार रोजी आपल्या महाविद्यालयातील हॉल उपलब्ध करून द्यावा हि नम्र विनंती

Tpdl2
दि. 26-12-2017
कक्षा वर्ग
उपलब्ध करून देणे

आपला विश्वासू

ऑल इंडीया मुल निवासी बहुजन समाज सेंट्रल संघ
(एम्बंस) जिल्हा कार्यालय, जालना.
दिनांक : 27/12/2017

प्रति,
मा. प्राचार्या,
राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय,
जालना.

विषय :- **एम्बंस च्या मिटींगसाठी एक हॉल उपलब्ध करून देणे बाबत.**

महोदय,

वरील विषयी विनंती करण्यात येते की, थि. चंद्रप्रकाश शिंदे जॉईंट सेक्रेटरी ऑल इंडिया मुल निवासी बहुजन समाज सेंट्रल संघ, मर्या. नागपूर हे दिनांक 31/12/2017 रोजी (रविवार) जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून बहूजन समाजाच्या समस्यावर मार्गदर्शन करणार आहेत.

तरी दिनांक 31/12/2017 रोजी आपल्या कॉलेजमधील एक खोली उपलब्ध करुन देण्यात यावी ही नम्र विनंती.

आपला

अध्यक्ष

ऑल इंडीया मुल निवासी बहुजन समाज सेंट्रल संघ
(एम्बंस) तथा अंबेडकराईड पार्टी ऑफ इंडिया
जिल्हा कार्यालय, जालना.

Tuedle
दि-28-12-2017
मिटींगसाठी
कार्यक्रम दौरा
देणे.

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना.

स्वयंरोजगार व व्यवसाय मार्गदर्शन व्याख्यान

## अहवाल : २०१८–१९

दिनांक : १०/०१/२०१९ रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना येथे स्वयंरोजगार व व्यवसाय मार्गदर्शन विभागांतर्गत विशेष व्याख्यान आयोजित केले या कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते –श्री.आंबादास रगडे (माजी जिल्हा समन्वयक स्टेट बँक ऑफ इंडिया) औरंगाबाद, तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.डॉ.नारायणराव मुंढे (संस्थेचे संस्थापक) व प्रमुख उपस्थिती प्राचार्य, डॉ. सुनंद तिडके, प्रा.डॉ. बापुसाहेब म्हस्के (स्वयंरोजगार व व्यवसाय मार्गदर्शन समिती प्रमुख) यांची उपस्थिती होती. या वेळी प्रमुख पाहुणे मा.आंबादास रगडे यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले की, बँक क्षेत्रात नोकरीची पध्दत कसी व स्पर्धेच्या काळात विद्यार्थ्यांनी कोणकोणत्या गोष्टीची काळजी घ्यावी या संदर्भात सविस्तर माहिती दिली. याच बरोबर विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक परीक्षा करीता सर्व विषयावर व्यापक विचार करुन आपले करीअर तयार करावे असे मत व्यक्त केले.

तसेच मा.डॉ. नारायणराव मुंढे यांनी सांगितले की, आजचा विद्यार्थी हा विविध स्पर्धेत टिकावा म्हणून त्यांनी परिश्रम करणे गरजेचे आहे. तसेच या कार्याक्रमानिमित्त प्रश्नाची उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आले.

या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांनी आपल्या भाषणात म्हटले की, महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थींनी यांनी विविध क्षेत्रात परिक्षामध्ये यश संपादन करण्यासाठी पुर्वीचे जुने व नविन पुतके संदर्भ ग्रंथ, वाचने आवश्यक आहे. तेव्हाच स्पर्धात्मक परिक्षामध्ये गुणवत्ता निर्माण करता येईल असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.डॉ. सविता मुंढे यानी केले तर आभार प्रा.डॉ.दादासाहेब गिन्हे यांनी मानले. या कार्यक्रमास प्राध्यापक वृंद व विद्यार्थी, विद्यार्थीनी यांची बहुसंख्येने उपस्थिती होती.

Tidk



प्राचार्य डॉ. सुनंदा लिडके मार्गदर्शन करतांना



विद्यार्थ्यांना बक्षिस देतांना श्री. आंबादास रगडे व

दिनांक :- १२/०३/२०१९.

प्रति,
मा. संपादक साहेब,
दैनिक __________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती.

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात आधुनिक महाराष्ट्र राज्याचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी

दि.१२ मार्च २०१९ रोजी आधुनिक महाराष्ट्र राज्याचे शिल्पकार व थोर विचारवंत व माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके हया होत्या तर प्रमूख पाहुणे प्रा.सचिन जयस्वाल हे होते.

प्रमूख पाहुण्यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावर प्रकाश टाकला यशवंतराव चव्हाण यांनी त्या काळात ज्या सुधारणा केल्या व आधुनिक दृष्टीकोण ठेवून जे कार्य केलेले आहे ते आजही समाजास उपयोगी आहे. यशवंतराव चव्हाण हे बोलके समाजसुधारक नव्हते ते कर्ते समाजसुधारक होते. आपल्या राजकीय पदाचा उपयोग त्यांनी जनकल्याणाकरीता केला असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके यांनी अध्यक्षीय समारोप करतांना सांगितले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी मानले.

प्राचार्या
राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय
जालना.

दिनांक :- १२/१२/२०१८

प्रति,
मा. संपादक साहेब,
दैनिक __________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती.

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयामध्ये स्व. लोकनेते गोपीनाथरावजी मुंढे साहेब यांची जयंती साजरी

आज दिनांक १२/१२/२०१८ रोजी स्व.लोकनेते गोपीनाथरावजी मुंढे यांची जयंती महाविद्यालयात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ.नारायणराव मुंढे, प्रमुख उपस्थती मध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा.भिमराव वाघ, प्रा.डॉ.गौतम वाकळे व प्रा.विठ्ठल गाडेकर हे लाभले होते.

कार्यक्रमाची सुरुवात स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंढे यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली. यावेळी प्रमुख वक्ते प्रा.भिमराव वाघ म्हणाले की, सर्वसामान्यांना सोबत घेवून चालणारा नेता होता.उसतोड कामगारांना न्याय मिळवुन देण्याचे काम मुंढे साहेबांनी केले. जात,पात,पक्ष बाजूला ठेवून काम करणारा नेता होता.लोकसभेत ओबीसींच्या जणगणनेसाठी आवाज उढवण्याचे काम त्यांनी केले.

दुसरे प्रमुख वक्ते डॉ.गौतम वाकळे बोलतांना म्हणाले की, मुंढे साहेब बहुजनांचा नेता होता. जनसामान्यांच्या मनावर राज्य करणारा बहुजनांचा राजा होता.गुन्हेगारीचा बिमोड करण्यासाठी त्यांनी कनखर भूमिका घेतली होती. विद्यापीठ नामांतरात त्यांचा महत्वाचा वाटा होता.त्यांचे व्यक्तीमत्व सृजनशील होते.

प्रा.विठ्ठल गाडेकर बोलतांना म्हणाले की, त्यांच्या जीवनातील ५ वर्ष वगळता आपले सर्व जीवन साहेबांनी जनतेसाठी खर्ची घातले. चांगल्या वाटेवर चालण्यासाठी मुंढे साहेबांचे विचार प्रेरणा देणारे आहेत. उसतोड कामगारांना एकत्र करुन त्यांना न्याय मिळवुन देण्याचे काम साहेबांनी केले.सर्वसामान्याच्या मनात त्यांच्याबददल आत्मियत्ता होती सर्वांना ते आपले वाटायचे. त्यांच्या या कार्याची दखल घेवून, त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्र शासनाने स्व.गोपीनाथ मुंढे उसतोड कामगार महामंडळाची स्थापना केली आहे.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांनी बोलतांना म्हणाल्या की, सर्वसामान्यांना आपले वाटणारे व्यक्तीमत्व, ओबीसीं साठी झगडणारा नेता अशी त्यांची ओळख होती. देशाच्या व मानवी विकासाच्या दृष्टीकोनातुन त्यांनी महत्वपुर्ण काम केले आहे.

अध्यक्षीय समारोप करतांना संस्थेचे अध्यक्ष मा.आ.डॉ.नारायणराव मुंढे यांनी त्यांचे विचार मांडतांना स्व.मुंढे साहेबांच्या सहवासातील आठवणींना त्यांनी उजाळा दिला.आज जर मुंढे साहेब असते तर, देशाचे आणि समाजाचे चित्र वेगळे राहिले असते. साहेबांच्या जाण्याने समाजाचे, महाराष्ट्राचे व पर्यायाने देशाचे खूप मोठे नुकसान झालेले आहे.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थीत होते. कार्यकमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ.सोमीनाथ खाडे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.संतोष देशपांडे यांनी मानले.

प्राचार्या

दै दुनियादारी दि ३१ जाने २०१९

दैनिक दुनियादारी duniyadari.jalna@gma

# राष्ट्रमाता महाविद्यालयात व्याख्यानमाला व वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे आयोजन

जालना,दि. ३०(प्रतिनिधी)- येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात दि. ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०१९ दोन दिवशीय कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. यात दि. ३१ जानेवारी रोजी विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने व्यक्तीमत्व विकासाचे पैलु या विषयावर व्याख्यान देण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन प्रा.डॉ. विठ्ठल जाधव, महेश उफाड, कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. नारायणराव मुंढे यांची उपस्थिती राहणार असून यावेळी प्रा.सत्संग मुंढे, प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे तसेच दि. १ फेब्रुवारी रोजी सामजिक न्याय व्याख्यानमाला व वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी सामजिक न्याय व्याख्यानमाले निमित्त लोकशाहीमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी. या विषयावर व्यांख्यान देण्यासाठी प्रमुख पाहुणे बालहक्क आयोग अध्यक्ष प्रा. प्रविण घुगे, व्याख्याते अधिसभा सदस्य डॉ. बा.आं.मराठवाडा विद्यापीठाचे प्रा.डॉ. शंकर अंभोरे हे उपस्थित राहणार असून यावेळी प्रा. सत्संग मुंढे, प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके, हरिभाऊ वाघ, डॉ. अनिल कायंदे, डॉ. कविता केंद्रे, अब्दुल कुद्देस काझी यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमास जालना शहरातील रसिक मंडळींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके, प्रा. विठ्ठल गाडेकर, प्रा. सचिन जैस्वाल यांनी केले आहे.

# प्रांजल पिवळचे तायक्वांदो कराटे स्पर्धेत यश



जालना,दि. ३०(प्रतिनिधी)- येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयातील ११ विज्ञान शाखेची विद्यार्थीनी कु. प्रांजल जनार्धन पिवळे हिने दि. १८ ते २० जानेवारी दरम्यान पुणे येथे झालेल्या तिसऱ्या राष्ट्रीय खुले तायक्वांदो कराटे स्पर्धेत यश संपादन केले. विशेषत हॉरंगी तायक्वांदो अॅकडमी यांनी या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत कु. प्राजल पिवळ ११ वी विज्ञान ज्युनिअर गटातून ४४ ते ४८ किलो गटात ब्राँझ पदक मिळविले असून तिची पुढील आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी दक्षिण कोरीया या ठिकाणी निवड झाली आहे. तिच्या या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष मा.डॉ. नारायणराव मुंढे, प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके, प्रा.डॉ. प्रताप रामपुरे, प्रा.लहराव दरगुडे, प्रा.विजय तिडके, प्रा. शोभा गायकवाड, प्रा.विजय राठोड इत्यादींनी अभिनंदन

पुढारी

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयामध्ये व्याख्यानमाला

**जालना, प्रतिनिधी** : शहरातील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात सामाजिक न्याय व्याख्यानमाला व पारितोषिक वितरण कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी डॉ. नारायण मुंढे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रवीण घुगे, डॉ. अनिल कायंदे, प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांची उपस्थिती होती.

युवकांनी स्वप्न घेऊन जगले पाहिजे. जगातील सर्वोत्तम असे संविधान हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपणास दिले व त्याद्वारे कुठलीच वाईट घटना किंवा रक्ताचा थेंब सुद्धा न सांडता मोठ-मोठे सत्तांतर होतात. हे केवळ संविधानामुळे शक्य असल्याचे प्रवीण घुगे यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोपात मुंढे म्हणाले की, सर्वांना संभाळुन घेणे हेच फार मोठे काम आहे. ते राज्य करण्यापेक्षा मोठे आहे. आपले मत व्यक्त करणे आपली अभिव्यक्ती जपण्याचं स्वातंत्र्य हे सर्वांच आहे. हे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाने, अभिव्यक्ती स्वातंत्र्य बहाल केल्याने शक्य असल्याचे ते म्हणाले. यावेळी मोठी उपस्थिती होती.

कुसुमाग्रजांचे साहीत्य माणसाच्या कर्तृत्वाला सलाम करणारे आहे
— प्रा. डॉ. के. जी. सोनकांबळे

मा. संपादक
दै. ______

आपल्या वृत्त पत्रामध्ये बातमीस प्रसीध्दी द्यावी ही विनंती.

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालया मध्ये, मराठी राज भाषा गौरव दिनाचे आयोजन ~~करण्यात~~ दि. 26.2.2019 रोजी करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. नारायनरावजी मुंडे, प्रमुख उपस्थीती प्राचार्य सुनंदा तिडके होते. या वेळी प्रमुख वक्ते म्हणून बोलत असतांना प्रा. डॉ. केजी सोनकांबळे यांनी, कुसुमाग्रज यांचा जन्म दिवस हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करतो ~~(त्यांचे)~~ ज्ञानपिठ पुरस्कार प्राप्त कुसुमाग्रजांचे साहीत्य हे मराठीच्या शिरावर ज्ञानाचा तुरा रोवणारे होते. कथा कादंबरी आणि कविता हा त्यांच्या साहीत्याचा प्राण होते. इंग्रजांच्या राजवटीत सुद्धा त्यांचे मराठी साहीत्य, बहारत होते. माणसाचे कर्तृत्व, माणसाची महानता, ही त्यांचा आशय होता. बाबा आमटे यांच्या सत्कार प्रसंगी त्यांचे महारोग्यांची सेवा करणारे योगदान हा विषय कुसुमाग्रजांना माणसाच्या कर्तृत्वाला सलाम करणारा ठरला. या वेळी संस्थेचे व कार्यक्रमाचे अ. मा. नारायनरावजी मुंडे यांनी कुसुमाग्रजांच्या साहीत्यातील स्वातंत्र्य चळवळीतील योगदानावर प्रकाश टाकला. आधुनिक कुकुदराज कवियत्री महादंबा असे मराठीत आहे कर्तृत्ववान माणसामुळेच मराठी भाषा टिकुन आहे असे प्राचार्य सुनंदा तिडके यांनी, ~~विः~~ माणसाने सतत वाचन केले वाचनाने माणसाचे मन सुसंस्कृत बनते. जेव्हा माणसे मन विस्थापित होतात तेव्हा साहीत्य हे ~~आ~~ माणसाला जाणि भान देण्याचे काम करते असे निवेदन केले. प्रास्ताविक सुत्र संचालन प्रा. डॉ. उमेश मुंडे यांनी तर आभार प्रदर्शन [illegible]

दिनांक :- ०७/०३/२०१९

प्रति,
मा. संपादक साहेब,
दैनिक __________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती.

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात नेहरु युवा केंद्र कार्यकम संपन्न

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात भारत सरकार आयोजित नेहरु युवा केंद्र जालना तर्फे कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके हया होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून नेहरु युवा केंद्राचे श्री. शिवाजी खरात (जिल्हा समन्वयक नेहरु युवा केंद्र) हे होते तर प्रमूख उपस्थीतीत शिवाजी खरात नेहरु युवा केंद्राचे लेखा अधिकारी हे होते. तसेच प्रा.डॉ. सोमीनाथ खाडे हे ही उपस्थीत होते.

शिवाजी खरात यांनी युवकांना जागृत राहण्याचे आवाहन केले व योजनांचा लाभ घ्यावा असे सांगितले. नेहरु युवा केंद्राबददलची सविस्तर माहिती त्यांनी दिली व औरंगाबाद चौफुलीवर असलेल्या कार्यालयाशी संपर्क साधून युवक-युवतींनी विविध योजनांचा लाभ घ्यावा असे सांगितले. तसेच आभासी जगात युवा वर्ग अडकलेला आहे व त्यांना बाहेर काढण्यासाठी कृती कार्यक्रम आवश्यक आहे. तसेच नियम पाळणे देखील एक प्रकारची देशभक्ती आहे असे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके यांनी मुलींना समान दर्जा मिळावा यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न झाले पाहिजे. तसेच महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या विचारामुळे व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या घटनेमुळे समानतेचे मूल्य जोपासल्या जात आहे. त्यामुळे मुलींनी देखील पूढे येवून आपला विकास साधला पाहिजे व स्वातंत्र्य समता व बंधूता वाढीस लावले पाहिजे असे सांगितले.

याप्रसंगी सूत्रसंचलन श्री. तिरुपती मोरे यांनी केले तर आभार श्री.मिलींद सावंत सर यांनी मानले. याप्रसंगी बहुसंख्य विद्यार्थी, विद्यार्थीनी व कर्मचारी उपस्थीत होते.

प्राचार्य

दिनांक :- ०८/०३/२०१९

प्रति,
मा. संपादक साहेब,
दैनिक ____________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती.

# ८ मार्च जागतिक महिला दिन
# स्त्री-पुरुष कृतिशिल समता प्रस्थापित झाली पाहिजे
**- सुरेखा आंचलखांब**

राष्टमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके हया अध्यक्षस्थानी होत्या तर प्रमूख पाहुणे सौ.सुरेखा आंचलखांब व शमीम पी. पठाण हया होत्या.

प्रमूख पाहुणे सुरेखा यांनी असे सांगितले की, हा अर्ध्या लोकसंख्येचा दिवस आहे व मानव समाज तेव्हाच प्रगतीशील समजल्या जाईल जेव्हा माणूस माणसाला समान समजेल मग तो पुरुष असो की, स्त्री-पुरुष कृतिशील समता प्रस्थापित झाली पाहिजे असे त्या म्हणाल्या.

प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांनीही समानतेची भावना जोपासत प्रगती करावी व खूप-खूप यशस्वी व्हावे असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. या कार्यकमास प्रा.डॉ.सविता मुंढे, प्रा.डॉ.आलिया कौसर, प्रा.डॉ.ज्योती धर्माधिकारी तसेच विद्यार्थी, विद्यार्थीनी व प्राध्यापक, शिक्षकेत्तर बंधू भगिनी मोठया संख्येने उपस्थित होते.

कार्यकमाचे सूत्रसंचलन प्रा.डॉ.शोभा यशवंते यांनी केले तर आभार प्रा.शोभा गायकवाड यांनी मानले.

प्राचार्या
राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय,
जालना.

दिनांक :- २६/०३/२०१९

प्रति,
मा. संपादक साहेब,
दैनिक __________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती.

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात शहीद भगतसिंग यांची जयंती साजरी

दि.२३ मार्च २०१९ रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात शहीद भगतसिंग यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके या होत्या. याप्रसंगी प्रा.गायकवाड शोभा, प्रा.विजय राठोड, अर्जुन भाबड, चत्रभूज मुंढे, संजय मुंढे, धनंजय वाघ, शिलाताई खेडकर हे उपस्थीत होते.

प्राचार्या

प्राचार्य
राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय
जालना.

दै. कृष्णाकाठ दि. १९ मार्च २०१९




# राष्ट्रमाता महाविद्यालयात जिल्हा युवा मेळावा

जालना/प्रतिनिधी

भारत सरकारच्या अंतर्गत असलेल्या नेहरू युवा केंद्र जालना कार्यालयाच्या वतीने ६ मार्च रोजी जूना जालना, येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात युवा मेळावा नुकताच पार पडला.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके या होत्या. तसेच नेहरू युवा केंद्राचे जिल्हा युवा समन्वयक शिवाजी खरात, राष्ट्रीय सेवा योजनाचे डॉ. सोमीनाथ खाडे, मिलींद सावंत, वाघ, लेखाधिकारी वसंत सुर्वे, तिरूपती मगर, जयपाल राठोड आदिंची होते. प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके म्हणाल्या की, प्रत्येक मुलांनी प्रत्येक मुलींना समानतेची वागणूक द्यावी व मुलगा-मुलगी भेदभाव मनात ठेवू नये. तसेच जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून शंभर युवक-युवती उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार तिरूपती मगर यांनी मानले.

दिनांक :- १४/०४/२०१९

प्रति,

मा. संपादक साहेब,
दैनिक __________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती.

# राष्टमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती संपन्न

जालना येथे आज दि.१४ एप्रिल २०१९ रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२८ वी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुंनदा तिडके या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणुन महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी ॲड.अनिल मिसाळ, सौ.प्रभा जाधव, कवयत्री सौ. रेखा गतखणे उपस्थीत होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन दिपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी कवयत्री रेखा गतखणे बोलतांना म्हणाल्या की, बाबासाहेबांनी भारताचे सविंधान निर्माण केले. बाबासाहेबांना सुरुवातीला शिक्षणाचे धडे त्यांचे वडील रामजी यांनी दिले. शिक्षण घेत असतांना त्या कालखंडातील वर्ण व्यवस्थेमुळे बाबासाहेबांचे खुप हाल झाले होते. भारतातील शिक्षण पुर्ण केल्यानंतर पुढील शिक्षणासाठी ते इंग्लडला गेले बाबासाहेबांना शिक्षण घेत असते वेळी रमाईची पण खुप साथ लाभलेली आहे. परदेशातील समानता आणि स्वदेशातील विषमता बाबासाहेबांना विचलित करायची. जो पर्यंत समाज शिक्षण घेणार नाही तोपर्यंत देशातील विषमता दूर होणार नाही म्हणुन ते लोकांना शिक्षणाचे महत्व सांगायचे. आपल्या कवितेच्या माध्यमातून कवयत्री गतखणे यांनी बाबासाहेंबांच्या जीवनातील चांगल्या आणि वाईट प्रसंगाला उजाळा दिला.

दुस-या प्रमुख पाहुण्या मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की, समाज परिवर्तन घडवुन आणायचे असेल तर त्यासाठी प्रामुख्याने प्राथमिक शिक्षण दर्जेदार असले पाहिजे असे बाबासाहेबांना वाटायचे. स्त्री शिक्षणासाठी बाबासाहेब अहोरात्र झटत होते. प्रभा जाधव यांनीही आपल्या कवितेच्या माध्यमातून बाबासाहेबांच्या कार्यावर प्रकाश टाकला.

तिसरे प्रमुख पाहुणे ॲड. अनिल मिसाळ बोलतांना म्हणाले की, बाबासाहेबांना जी समाजवादी व्यवस्था हवी होती तशी आजही निर्माण झालेली नाही. महामानवांना सदयस्थीतीत ठरावीक गटात संकुचित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. समानता, अंधश्रध्दा व समाज परिवर्तन करणा-यांच्या हत्या केल्या जात आहे.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके म्हणाल्या की, विचारवंतांनी केलेले समाज परिवर्तनाचे कार्य पुढे नेण्याचे काम आपणा सर्वांना कराचये आहे. शोषण विरहीत समाज बाबासाहेबांना निर्माण करायचा होता पण तसे होवू शकले नाही. सक्षम नागरीक घडवण्याचे काम शिक्षकांना करावयाचे आहे. स्वतः हाल अपेष्टा सहन करुन समाजजागृत कराण्याचे अतिशय अवघड आणि कठीण काम बाबासाहेबांनी केलेले आहे. विचाराची लढाई ही विचारानेच झाली पाहिजे.

या कार्यक्रमासाठी मोठया संख्येने विद्यार्थी , प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थीत होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.लहुराव दरगुडे यांनी केले तर आभार प्रा.सचिन जयस्वाल यांनी मानले.

प्राचार्या



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या
महापरिनिर्वाण दिनानिमित्त ग्रंथालयास पुस्तक भेट





लोकनेते स्व. गोपिनाथराव मुंडे जयंती ।
१२ डिसेंबर 2018.



03-01-2019

क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले जयंती.
मार्गदर्शन करताना प्राचार्या सुनंदा तिडके मॅडम



03-01-२०१९

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग जालना
जिल्हा व राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन विभाग
तर्फे महाविद्यालयीन मतदारांसाठी EVM voting machine.

12-01-२०१९ · राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती कार्यक्रम







14-01-2019.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
नामविस्तार दिन व भुगोल दिन



दि. 17-01-2019
युवा संसद निवड चाचणी स्पर्धा
कार्यक्रम संपन्न.



21-01-2019.

राष्ट्रसंत भगवानबाबा पुण्यतिथी निमित्त मार्गदर्शन करताना मा. आ. डॉ. नारायणराव मुंढे







मार्गदर्शन करताना प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके मॅडम.

23-01-2019

"नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती"






28 जानेवारी २०१९.

जालना जिल्हा युवा संसद

युवा मंत्रालय भारत सरकार व राष्ट्रीय सेवा योजना आयोजीत ,

30-जानेवारी 2019.

महात्मा गांधी पुण्यतिथी



३१-जानेवारी २०१९.

विद्यार्थी विकास विभागांतर्गत

विशेष व्याख्यान .



त्यागमुर्ती माता रमाई जयंती.
दि 07-02-2019.



संत सेवालाल महाराज जयंती
दि. 15-02-2019




प्रा. राठोड विजय, प्रा. डॉ. जगनाथ शिंदे प्रा. सचिन जयस्वाल, प्रा. डॉ. चव्हाण एस. डी. शिलाताई

दि. 19 फेब्रुवारी 2019.

छत्रपती शिवजी महाराज जयंती

मार्गदर्शक:- प्रा. पालवे रामनाथ

डॉ. शिंदे [illegible]

प्राचार्य. डॉ. सुनंदा तिडके मॅडम



संत गाडगे बाबा जयंती.




23 फेब्रुवारी 2019.




स्वातंत्र्यवीर सावरकर वि.दा

यांची पुण्यतिथी साजरी

26-02-2019

28-02-2019 रोजी

राष्ट्रीय विज्ञान दिन वनस्पतिशास्त्र विभागात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाचे नाव ~~अध्यक्ष~~ ~~प्रमुख~~

26 नोव्हेंबर 2018

भारतीय संविधान दिन

कार्यक्रमाचे अध्यक्ष - प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके

उपस्थिती - प्रा. सचिन जयस्वाल, प्रा. डॉ. सोमनाथ वाड.

संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन करण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजक राज्यशास्त्र विभागातर्फे होते.

06 डिसेंबर 2018

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणाच्या कार्यक्रमात अध्यक्ष, मा. आ. डॉ. नारायणराव मुंडे होते.

कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थित प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके होत्या.

प्रमुख वक्ते प्रा. डॉ. शोभा यशवंते
प्रा. डॉ. ज्योती धर्माधिकारी
प्रा. डॉ. प्रमोद चव्हाण होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. डॉ. ज्योती धर्माधिकारी यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. प्रमोद चव्हाण यांनी मांडले

12 डिसेंबर 2018

लोकनेते स्व. गोपिनाथराव मुंडे जयंती कार्यक्रम

वेळ :- 11:20 वा.

कार्यक्रमाचे अध्यक्ष. मा. आ. डॉ. नारायणराव मुंडे साहेब

प्रमुख उपस्थिती. प्राचार्य डॉ. सुरेखा तिडके

वक्ते - प्रा. भिमराव वाघ
प्रा. गौतम वाकळे
प्रा. विठ्ठल गाडेकर

सूत्रसंचालन. प्रा. डॉ. सोमनाथ खाडे

आभार - प्रा. डॉ. संतोष देशपांडे

दि. 14-12-2018 शुक्रवार

~~दि. 15-12-2018 शनिवार.~~

~~श्री. धनंजय बी. वाघ~~

श्रीयश इंजिनिअरिंग कॉलेज सातारा परिसर औरंगाबाद येथिल प्राध्यापकांनी महाविद्यालयास भेट दिली. 12 वी विज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी तसेच त्यांना ऑनलाईन फॉर्म कसे भरायचे, कोणती फिल्ड निवडायची फॉर्म भरण्याची दिनांक विद्यार्थ्यांना माहिती द्यावी या करिता फोननंबर सहित 12 वी विज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांची यादी त्यांच्या कडे दिली.

भेट देणारे प्राध्यापक (1) शेख सर - 9970818423
(2) संदिप राठोड - 9922042993

वरील सरांनी प्राचार्यांशी चर्चा केली.

दि. 15-12-2018.

श्री. धनंजय जी. वाघ लॅब अटेंडंट
यांचा वाढदिवस महाविद्यालयात साजरा
करण्यात आला

सकाळी 10.35 वा. प्राध्यापक व ऑफिस नॉन
टिचिंग स्टॉफ धनंजय यांना हार घालून
सर्वांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या
नंतर प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांनी
प्राचार्य कक्षामध्ये धनंजय यांना हार घालून
सत्कार करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या

तसेच प्रा. डॉ. धर्माधिकारी ज्योती
यांना प्रिझम या साहित्याला राज्यस्तरीय
पुरस्कार मिळाल्या बद्दल त्यांचापण सत्कार करण्यात
आला.

दि:- 19-12-2018

बुधवार

डायनामिक अॅकॅ कॉम्पुटर ॲकाडमी
अंकुश करको केकशन हॉल. सुरूप कॉकणी जालना

मो श्री कुरेशी 8149256930, 9764978665

यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कॉम्पुटरच्या वेगवेगळ्या कोर्सेस विषयी माहिती दिली.
एक परिक्षा घेतली जाईल त्यात ज्यांना जास्त गुण मिळतील असा विद्यार्थ्यांना कोर्सेस मध्ये फी सवलत मिळेल असे सांगितले

हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या करियर व स्वंयरोजगार व व्यवसाय मार्गदर्शन समिती तर्फे घेण्यात आला
प्रा.डॉ. म्हस्के सरांनी प्रस्तावना केली.
कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन प्राचार्य डॉ. सुनेत्रा तिडके या होत्या.

19-12-2018

## Gathering.

Ashlesha Kids.

दि. 19-12-2018 रोजी संध्याकाळी राजमाता इंदिरा गांधी महाविद्यालयाच्या परिसरात अश्लेषा किड्सच्या शाळेचे स्नेहसंमेलनाचे कार्यक्रमा आयोजित केले होते.

दि:- 01-01-2019.

नवीन वर्ष शुभेच्छा.

सकाळी ठिक. 11.30 वा. मा. अध्यक्ष डॉ. नारायणराव मुंढे साहेब यांच्या कॅबिन मध्ये सर्व प्राध्यापकांना बोलाविण्यात आले चहा पाणी कार्यक्रम झाला. त्याठिकाणी प्रा. डॉ. जी. आर. खेडकर यांना उपप्राचार्य पदाचे पत्र देण्यात आले तसेच प्रा. डॉ. ज्योती धर्माधिकारी यांना नॅक कन्व्हेनर (Convenar). या पदाचा पत्र संस्थापक अध्यक्ष डॉ. नारायणराव मुंढे साहेबांनी यांनी दिले.

PAGE No.
DATE / /

03-01-2019

"क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले जयंती"

सकाळी 9.45 वा. सेमिनार हॉल मध्ये क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली

कार्यक्रमाचे अध्यक्ष :- प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके

प्रमुख वक्ते : प्रा. शोभा गायकवाड

प्रमुख उपस्थिती :- प्रा. डॉ. संतोष देशपांडे

सुत्र संचलन :- प्रा. डॉ. चव्हाण एस. टी.

आभार :- प्रा. डॉ. बापुसाहेब म्हस्के.

PAGE No.
DATE / /

03-01-2019

महाराष्ट्र राज्य निवडणुक आयोग जालना व
जिल्हा व राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन विभाग
अंतर्गत महाविद्यालयीन नवमतदारासांठी

EVM Voting machine [VV Pat]
-चे डेमो दाखविण्यात आले

मास्टर ट्रेनर :- कदम साहेब, झुंजे साहेब
जिल्हा निवडणुक अधिकारी कार्यालय
जालना

आयोजक : ① प्रा. सचिन जयस्वाल राज्यशास्त्र विभाग
② प्रा. डॉ. चव्हाण पी. टी. लोकप्रशासन विभाग

कार्यक्रमाचे अध्यक्ष :- प्राचार्या तिडके सुनंदा.

स्थळ : सेमिनार हॉल.

स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन →

PAGE No.
DATE / /

दि. 07-01-2019.

भुगोल विभागातर्फे
विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षा विषयी मार्गदर्शन पर व्याख्यानाचे आयोजन सेमिनार हॉल मध्ये करण्यात आले.

मार्गदर्शक :- प्रा. सुरेश पोद्दार सर 9823047716

प्र. उपस्थिती : प्रा. ढोकळे पी. के.
प्रा. केंद्रे निं. मन.
प्रा. रवाई सोमिनाथ.

कार्यक्रमाचे अध्यक्ष :- प्राचार्या तिडके सुनंदा.

PAGE No. DATE / /

10-01-2019.

"स्वयंरोजगार व व्यवसाय मार्गदर्शन"

कि विभागांतर्गत व्याख्यान

कार्यक्रमाचे अध्यक्ष :- मा. आ. डॉ. नारायणराव मुंडे

प्रमुख वक्ते :- श्री. आंबादास रगडे [माजी समन्वयक] स्टेट बँक ऑफ इंडिया.

प्र. उपस्थिती :- प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके

समिती प्रमुख :- प्रा. डॉ. बी. एल. म्हस्के.

स्थळ :- सेमीनार हॉल वेळ. 11-00 वा.

11-01-2019.

ठिबक सिंचन

महाविद्यालय परिसरातील झाडांसाठी ठिबक सिंचन बसविण्यात आले. प्राचार्य डॉ. तिडके मॅडम यांच्या हस्ते उद्घाटन.

प्र. उपस्थिती मध्ये. प्रा. डॉ. सोमीनाथ खाडे
प्रा. डॉ. नवनाथ शिंदे
कार्यालयीन अधिक्षक - श्री. भास्कर शिंदे व इतर कर्मचारी.

PAGE No.
DATE / /

12-01-2019.

राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती कार्यक्रम.

कार्यक्रमाचे अध्यक्ष: प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे. डॉ. शोभा यशवंते
प्रा. रामनाथ पाळवे.

सुत्रसंचलन :- प्रा. सचिन जयस्वाल

आभार : प्रा. डॉ. सोमीनाथ खाडे

दि - 14-01-2019.

PAGE No.
DATE / /

मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार दिन.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद. व भूगोल दिन.

रौप्य महोत्सवी [25 वा वर्धापन दिन].

कार्यक्रमाचे अध् अध्यक्षा.
प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके

प्रमुख वक्ते ① ॲड. शिवाजीराव आदमाने
② प्रा. डॉ. हाळणे पी. के.

सूत्रसंचलन :- प्रा. डॉ. विजय केंद्रे
विभागप्रमुख भूगोल विभाग

आभार :- प्रा. डॉ. नवनाथ शिंदे,

कार्यक्रमाचे ठिकाण :- सेमीनार हॉल.

## शैक्षणिक सहल बैठक

दि. १५-०१-२०१९ रोजी कार्यक्रम झाल्या नंतर सहल समितीने विद्यार्थ्यां सोबत चर्चा केली या वेळी वनस्पतीशास्त्र विभागाचेही प्राध्यापक उपस्थित होते.

सहलीचे महत्व पटवुन देण्यात आले. सहलीचा ठिकाण निश्चित करण्यात आले.

16-01-2019.

शैक्षणिक सहल.

दि-16-01-2019 रोजी महाविद्यालयाची शैक्षणिक शाळीचे आयोजन

प्रथम इ इश्वटेक सिंदखेडराजा रोड येथे भेट देण्यात आली. कॅम्पोटेक, टिश्यु कल्चर या विषयी माहिती मिळविली नंतर सिंदखेडराजा आणि लोणार सरोवर. लोणार सरोवर येथील पाण्याचा, अभ्यास, आकृती, औषधी वनस्पतीचा अभ्यास करण्यात आले. येथे विद्यार्थ्यांना बरीच माहिती मिळाली

PAGE No.
DATE / /

दि. 17-01-2019.

युवा संसद निवड चाचणी स्पर्धा
स्पर्धा कार्यक्रम संपन्न.

राजमाता इंदिरा गांधी महाविद्यालय जालना
येथे
युवा मंत्रालय भारत सरकार व
राष्ट्रीय सेवा योजना जालना जिल्हा
यांच्या संयुक्त विद्यमाने युवा संसद जिल्हा निवड
चाचणी स्पर्धा घेण्यात आल्या
स्पर्धेचे उद्घाटक प्राचार्य डॉ सुनंदा तिडके ह्या
होत्या
प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. सुभाष वाघमारे व
प्रा डॉ. सोमीनाथ खाडे
जिल्हा समन्वयक रा. से. योजना

परिक्षक :- ① प्रा. डॉ. भाऊसाहेब वेव्हार
② श्री. अभिनव वर्मा (जिल्हा समन्वयक नेहरू युवा कें
③ प्रा. माजी सहदेवा, प्रा. प्रमोद जायभाय
स्पर्धेसाठी जिल्ह्यातील बरेच विद्यार्थी स्पर्धक
म्हणून उपस्थित होते.
स्पर्धेचे विषय होते ① सामाजीक व आर्थिक सशक्तीकरणासाठी
किरकोळ घटकांचा समावेश
② महिला सबलीकरणासाठी बेटी बचाव,
③ सुकन्या समृद्धी योजना आणि मुद्रा योजना, सर्व
नागरिकांसाठी सहजसुलभ जीवन उपलब्ध
करण्याकरण्याची खात्री व भ्रष्टाचार रोखण्यासाठी शुन्य
सहिष्णुता धोरण या विषयावर स्पर्धकांनी विचार
मांडले

PAGE No.
DATE / /

19-01-2019.

जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय जालना येथे.

दि. २५-जानेवारी २०१९ ला राष्ट्रीय मतदार दिवस साजरा ~~करण्यासाठी~~ करण्यासाठी पुर्व तयारी बैठक.

या बैठकीला आपल्या महाविद्यालयातुन प्रा. सचिन जयस्वाल व प्रा. डॉ. प्रमोद चव्हाण हे उपस्थित होते.

21-01-2019.

PAGE No.
DATE / /

राष्ट्रसंत भगवानबाबा पुण्यतिथी

महाविद्यालयात राष्ट्रसंत भगवानबाबा यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष:- मा. आ. डॉ. नारायणराव मुंडे

प्रमुख उपस्थिती :- प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके मॅडम (आंदुरे)

प्रमुख वक्ते:- (1) प्रा. डॉ. गौतम वाकळे
(2) प्रा. डॉ. विक्रम दहिफळे

सोबती विचार मांडणारे
(1) प्रा. डॉ. शिंदे डि. पी. (2) प्रा. डॉ. चव्हाण पी. टी.

सूत्रसंचलन:- प्रा. डॉ. बी. एल. क्षीरसागर

आभार:- प्रा. देशमुख एल. बी.

स्थळ:- सेमीनार हॉल.

PAGE No.
DATE / /

23-01-2019.

नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती कार्यक्रम

11.20 वा. प्राचार्य कक्षा मध्ये घेण्यात आला.

का. अध्यक्षा :- प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके मॅडम

प्रमुख पाहुणे. प्रा. डॉ. सविता मुंढे मॅडम

उपस्थिती. प्रा. डॉ. रामफुरे, प्रा. गाडेकर. प्रो. जयस्वाल
प्रा. दरगुडे सर.

24-01-2019

मान - मास - मास - विशेष शिबिर समारोप

मौजे बोरखेडी ता- जी- जालना, सिंदखेड राजा रोड वर येथील 07 दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमदान शिबीरचा समारोप कार्यक्रम दि- 11:00 सकाळी वा- घेण्यात आले

कार्यक्रमाचे अध्यक्ष :- प्राचार्या डॉ. ~~नारायणराव~~ ~~मुंडे~~ डॉ. सुनंदा तिडके मॅडम.

प्र- पाहुणे-

दि: 24-01-19- कॅम्प हून परत आल्यावर समजले की- मा- अ- डॉ- नारायणराव मुंडे साहेब यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या लोकसभा उमेदवार निवड समितीवर निवड करण्यात आली ~~सर्व~~ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी साहेबांना अभिनंदन केले सत्कार केला

PAGE No.
DATE / /

26-01-2019.

भारतीय "प्रजासत्ताक दिन"

सकाळी दि.का. 7.20 वा झेंडा वंदन करून साजरा करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष मा-आ. डॉ. नारायणराव मुंढे साहेब यांच्या हस्ते झेंडा फडकविण्यात आले

प्र-उपस्थिती प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके मॅडम महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

PAGE No.
DATE / /

28 जानेवारी 2019.

जालना जिल्हा युवा संसद
District Youth Parliament
" युवा मंत्रालय भारत सरकार व राष्ट्रीय ~~सेवा~~
सेवा योजना आयोजीत.

National youth parliament festival 2019.

~~Be~~
'Be the voice of New India
find solutions and contribute to
policy
" Priminister Narendra modi's.
clarion call for youth-led development.

उद्घाटक :- मा. आ. डॉ. नारायणराव मुंढे साहेब

प्रमुख पाहुणे ① प्रा. बी. वाय. कुलकर्णी
② मा. देशमुख विजय

प्रमुख उपस्थिती :- प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके मॅडम.

परिक्षक ① प्रा. बी. वाय कुलकर्णी.
② प्रा. मुळीक ~~म~~
मोरेश्वर महाविद्यालय भोकरदन
③ प्रो डॉ. आतिया कौसर
④ प्रा. बागी सहदेवन
टाईम किपर :- प्रा. मुंढे
समाजकार्य महाविद्यालय रामनगर

PAGE No. DATE / /

29-01-2019.

वार्षिक स्नेहसंमेलन 2019.

दि. 29-01-2019 रोजी खालील स्पर्धा महाविद्यालयात घेण्यात आल्या

1) मेंहदी स्पर्धा
2) काव्य वाचन
3) वक्तृत्व स्पर्धा -> सोशल मिडिया आणि तरुण.
4) वादविवाद स्पर्धा!
   उपाशी जलसाठे प्रदूषित आहेत किंवा नाहीत.

तसेच क्रिडा स्पर्धा घेण्यात आले

स्टेजची तयारी केली.

प्रा. डॉ. कॅंधळे विजय
प्रा. धुगे विजयमाला
प्रा. वाहुळ स्नेहा यांचे CAS कॅम्प औरंगाबाद ~~साठी येथे~~ येथे गेले.

30 जानेवारी 2019

महात्मा गांधी ~~आंना~~ पुण्यतिथी

स्थळ :- हॉल नं. 04.

कार्यक्रमाचे अध्यक्ष :- प्रा.डॉ. शोभा यशवंत.

प्र. पाहुणे :- प्रा.डॉ. विक्रम वाहिकळे.

वार्षिक स्नेहसंमेलन स्पर्धा

1) पाककृती, ② सामान्य ज्ञान स्पर्धा

③ फनिशमेंट ④ आनंदनगरी घेण्यात आली.

31- जानेवारी 2019

सकाळी 9.30 ते 10.30 रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या

12.30 वा. विद्यार्थी विकास विभागांतर्गत विशेष व्याख्यान

कार्यक्रमाचे अध्यक्ष :- मा. प्रा. डॉ. नारायणराव मुंडे साहेब

प्रमुख उपस्थिती :- प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके मॅडम.

प्रमुख मार्गदर्शक :- श्री महेश उगाडे. संचालक श्री मोटर ड्रायव्हिंग स्कूल जालना

प्रा. डॉ. विठ्ठल जाधव विभागप्रमुख : लोकप्रशासन विभाग कालिकादेवी महाविद्यालय शिरूर (का) बीड.

संचलन :- प्रा. डॉ. यशवंते एस. जे.

प्रास्ताविक व आभार : प्रा. डॉ. नवनाथ शिंदे

विद्यार्थी विकास समिती :- प्रा. डॉ. नवनाथ शिंदे. प्रा. पाजी सहदेव, प्रा. डॉ. यशवंते एस. जे. प्रा. डॉ. रामपुरे.

विद्यार्थी प्रतिनिधी : मयुर गोगडे, सपना वेग.

30 31-01-19.

दुपारी 3.30 नंतर फॅनसी ड्रेस स्पर्धा
नृत्य स्पर्धा, संगित रजनी हे
कार्यक्रम घेण्यात आले
संध्याकाळी 7.10 वा. खेल संगित रजनी व नृत्य
स्पर्धा खेळल्या.

संगित रजनी कार्यक्रमाचे उद्घाटनकर्ते
मा. आ. डॉ. नारायणराव मुंढे
प्र. उपस्थिती - प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके मॅडम.
प्रा. डॉ. पी. टी. चव्हाण :- संगीत रजनी कार्यक्रम
आयोजक.
प्रा. गाडेकर व्हि. आर. वार्षिक स्नेह संमेलन
प्रभारी प्रमुख.

01 - फेब्रुवारी 2019.

सकाळी 09.00 ते 10.00 वा ग्रंथ वाचन करण्यात आले.

वाचन कर्ते :- प्रा. डॉ. दादासाहेब गिर्‍हे.
प्रा. डॉ. प्रमोद नेवले
प्रा. डॉ. आलिया कौसर पठाण.

सामाजिक न्याय व्याख्यानमाला

① प्रमुख पाहुणे. प्रा. डॉ. शंकर अंभोरे [ आले नाही ]
[ अधिसभा सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

② मा. प्रविण घुगे [ अध्यक्ष बालहक्क आयोग म. रा. मुंबई ].

कार्यक्रमाचे अध्यक्ष :- मा. आ. डॉ. नारायणराव मुंडे मुंडे साहेब

विनित :- प्राचार्य. डॉ. सुनंदा तिडके मॅडम.
प्रा. सचिन जयस्वाल
सांस्कृतिक विभाग प्रमुख

वार्षिक स्नेह स्नेह संमेलन

दि - 01 - 02 - 2019 रोजी

सामाजीक न्याय व्याख्यान माला नंतर

वार्षिक स्नेह संमेलनाचे विविध

क्रिडा. सांस्कृतिक कार्यक्रम, स्टेज कार्यक्रम

ई - चे बक्षीस वितरण कार्यक्रम घेण्यात

आले

PAGE No.
DATE / /

02-02-2019 रोजी

वार्षिक स्नेह संमेलनानिमित्त

प्राचार्यांकडून सुट्टी जाहीर करण्यात आली.

माता रमाई जयंती
07-02-2019.

दि. 07-फेब्रुवारी 2019 रोजी महाविद्यालयात त्यागमुर्ती माता रमाई यांची जयंती साजरी करण्यात आले

कार्यक्रमाचे अध्यक्ष : प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके मॅडम

प्रमुख वक्ते : प्रा. शोभा गायकवाड मॅडम

15-02-19.

PAGE No. DATE / /

# संत सेवालाल महाराज जयंती

दि: 15- फेब्रुवारी 2019 रोजी 11:20 वाजता सेमीनार हॉल मध्ये संत सेवालाल महाराज जयंती साजरी करण्यात आली

कार्यक्रमाचे अध्यक्ष : प्रा. डॉ. चव्हाण मास. टी.

प्रमुख पाहुणे : प्रा. डॉ. मान मास. शिंदे
प्रा. विजय राठोड

संचलन आणि आभार : प्रा. सचिन जयस्वाल.

19-02-2019.

PAGE No.
DATE / /

# शिव जयंती.

दि. 19-फेब्रुवारी 2019 रोजी महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचा कार्यक्रम घेण्यात आला

कार्यक्रमाचे अध्यक्ष :- प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके मॅडम.

प्रमुख वक्ते :- प्रा. रामनाथ वाळके

सुत्रसंचलन :- प्रा. डॉ. शिंदे मान. मास.

आभार :- प्रा. विठ्ठल गाडेकर.

स्थळ - सेमिनार हॉल.

दि. 23/02/2019.

संत गाडगेबाबा जयंती

महाविद्यालयात राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

स्थळ : प्राचार्य कक्ष.

कार्यक्रमाचे अध्यक्ष :- प्राचार्या सुनंदा तिडके मॅडम

प्रमुख पाहुणे : प्रा.डॉ. सौ. शोभा यरावेत मॅडम

सुत्रसंचालन :- प्रा. सचिन जयस्वाल

आभार प्रा. विठ्ठल गाडेकर.

दि. 23-02-2019 रोजी

महाविद्यालयाचे शैक्षणिक ऑडीट

विभागी 11-00 वाजता केले.

26-02-2019.

PAGE No.
DATE / /

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकार स्मृति व पुण्यतिथी.

कार्यक्रमाचे अध्यक्ष: प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके मॅडम.

प्रमुख उपस्थिती :- प्रा. सचिन जायस्वाल

सूत्रसंचलन प्रा. विठ्ठल मांडेकर

आभार : प्रा. डॉ. वानखे जी. पल.

स्थळ: प्राचार्य कक्ष.

27-02-19

PAGE No.
DATE / /

दि. 27-02-2019 रोजी महाविद्यालयात
मराठी भाषा कुसुमाग्रज जन्म दिना निमित
मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला

कार्यक्रमाचे अध्यक्ष :- मा. आ. डॉ. नारायणराव मुंडे सचिव.

प्रमुख वक्ते :- प्रा. डॉ. सोनकांबळे
जे. ई. एस. कॉलेज जालना.

प्रमुख उपस्थिती :- प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके मॅडम.

आयोजक :- मराठी विभाग

सुत्र संचलन :- प्रा. डॉ. उमेश मुंडे.

आभार :- प्रा. डॉ. दादासाहेब गिऱ्हे सर

स्थळ :- सेमीनार हॉल.

28-02-19

# राष्ट्रीय विज्ञान दिवस

दि. 28-02-2019 रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला.

स्थळ :- वनस्पतिशास्त्र विभाग

प्रमुख उपस्थिती :- सर्व विज्ञान विभागातील प्राध्यापक.

सी. व्हि. रमण यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली

DATE 08/03/2019

# आंतरराष्ट्रीय महिला दिवस

8 मार्च 2019 विशाखा समिती आयोजित,

कार्यक्रमाचे अध्यक्ष:- प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके

प्रमुख पाहुणे :- सौ. सुरेखा आचलखांब
प्रा. पठाण मॅडम

सूत्रसंचलन :- प्रा. डॉ. शोभा यशवंते

आभारप्रदर्शन:- प्रा. डॉ. सविता मुंढे

स्थळ: सभागृह

DATE 12/03/2019

यशवंतराव चव्हाण जयंती.

12 मार्च 2019

कार्यक्रमाचे अध्यक्ष :- प्राचार्य डॉ. सुनंदा शिंदे .

प्रमुख पाहुणे : प्रा. विठ्ठल गाडेकर

सूत्र संचालन :- प्रा. सचिन जयस्वाल

आभार :- प्रा. डॉ. चव्हाण एस. डी.

PAGE No.
DATE 23/03/2019

क्रां. भगतसिंग, राजगुरु, सुखदेव
शहीद दिन
23 मार्च 2019

कार्यक्रमाचे अध्यक्ष :- प्राचार्य डॉ. सुनंदा शिडके.

प्रमुख उपस्थिती :- प्रा. शोभा गायकवाड
पाहुणे

श्री - अर्जुन आवड, चंद्रकांत मुंढे,
श्री नानाभाऊ नागरे, वाह. डी. जी.
श्री. बापूसाहेब ओंधळे.

स्थळ - कार्यालय -

PAGE No.
DATE 11-04-2019

महात्मा फुले जयंती
11 - एप्रिल 2019

कार्यक्रमाचे अध्यक्ष :- प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके.

प्रमुख पाहुणे :- प्रा. डॉ. संतोष देशपांडे.
प्रा. शोभा यशवंते.

प्रमुख उपस्थिती :- प्रा. डॉ. प्रशांत बेगाळे, प्रा. पराण आलिया कौसर, प्रा. डॉ. शोभा यशवंते. डॉ. मुंडे एस. जी. प्रा. लहुराव दरगुडे.

आभार :- डॉ. गोवर्धन रबडेकर.

स्थळ :- प्राचार्य कक्ष.

DATE 14-04-2019

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती.
14 एप्रिल 2019

कार्यक्रमाचे अध्यक्ष:- प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके

प्रमुख पाहुणे:- 1) डॉ. अनिल मिसाळ

2) रेखा गातखणे

3) प्रभा जाधव

सूत्रसंचालन:- ~~[illegible]~~ प्रा. विठ्ठल गाडेकर.

आभार:- ~~[illegible]~~ लहुराव दराडे

DATE 29/4/2019

राष्ट्रीय सेवा योजनेची बैठक पार पडली.

29 एप्रिल 2019 (आरोग्य शिबीर)

कार्यक्रमाचे अध्यक्ष -

प्रमुख पाहुणे.

स्थळ: भूगोल विभाग.

विद्यार्थी विकास विभागा अंतर्गत 29.4.2019

नेत्र व आरोग्य तपासणी शिबिर -

कार्यक्रमाचे अध्यक्ष - प्राचार्या डॉ. सुनंदा शिंदे.

तपासणी - श्री - गणेश कोरडे.

गणपती नेत्रालय जालना.

PAGE No.
DATE 30/4/2019

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती.
30 एप्रिल 2019
(विवेक वाहिनी अंतर्गत)

कार्यक्रमाचे अध्यक्ष:- प्राचार्या डॉ. सुनंदा लिडके.

प्रमुख पाहुणे :- प्रा. सचिन जयस्वाल,
श्री. बी. के. शिंदे सर

सूत्र संचालन :- प्रा. डॉ. शोभा यशवंते.

DATE 30/4/2019

Last working day
बैठक

अध्यक्ष - प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके.

उपस्थित :- प्राध्यापक व कर्मचारी वृंद.

स्थळ :- सभागृह.